
www.rajdand.com
पुणे, शुक्रवार
24.02.2023
पृष्ठ : ४ | मूल्य : ₹ ४.०० | फाल्गुन शु.५
/rajdandlive
Declaration No. : SDM/SR/07/2023

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९




'तारुण्याच्या दिवसांत मी मधुबालासारखी दिसायचे'


पान ४ वर..

# अभूतपूर्व गर्दी व प्रचंड उत्साहात आदित्य ठाकरे यांच्या रॅलीने पुणेकरांना जिंकले!

**पुणे : प्रतिनिधी**

**शिवसेना नेते, माजी मंत्री आदित्य ठाकरे यांच्या रॅलीने पुणे शहरातील वातावरण आज ढवळून निघाले. गर्दीचा उच्चांक व प्रचंड उत्साहात महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोषात या रॅलीने कसब्यातील वातावरण ढवळून काढले.**

कसबा विधानसभा पोटनिवडणुकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारार्थ येथील लाल महालापासून रॅलीला सुरुवात झाली. ठिकठिकाणी या रॅलीचे जोरदार स्वागत होत होते. दुतर्फा नागरिकांनी प्रचंड मोठी गर्दी केली होती. फडके हौद- देवजीबाबा मठ- हमजेखान चौक- नाना चावडी चौक हिंदमाता चौक मार्गे साखळीपीर तालीम चौक येथे रॅलीचा समारोप झाला व सहा वाजता आदित्य ठाकरे यांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम लाल महालमधील बालशिवाजी व राजमाता जिजाऊ यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



शिवसेनेचे नेते सचिन आहेर, माजी आमदार मोहन जोशी, आदींसह महाविकास आघाडीतील तीनही पक्षांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. शिवसेनेचे शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, राजेंद्र शिंदे, नागेश खडके, संजय वाल्हेकर, विकी धोत्रे, मकरंद पठेकर, काँग्रेस पक्षाचे सुरेश कांबळे, दादासाहेब बोत्रे, माजी नगरसेविका पल्लवी जावळे आदी प्रमुख पदाधिकाऱ्यांसोबत आदित्य ठाकरे यांनी उघड्या जीपमधून रॅलीला सुरुवात केली. 'पन्नास खोके, एकदम ओके' तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उल्लेख असलेल्या 'गद्दार शिंदे' अशा घोषणा देत रॅलीने लाल महालपासून प्रारंभ केला.

काँग्रेसचे माजी मंत्री सुनिल केदार हे आदित्य ठाकरे यांच्यासमवेत जीपमध्ये बसले होते. फटाक्यांची भव्य आतषबाजी, भगवे फुगे, तसेच भगव्या पताक्यांच्या माळांचा वर्षाव ठिकठिकाणी रॅलीच्या मार्गात होत होता. दुचाकी गाड्यांवरील तरुण-तरुणींनी भगवे कोट परिधान केले होते.

# शास्तीकर रद्दचा शासन आदेश काढणारच

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**पिंपरी : प्रतिनिधी**

भाजप-शिवसेना व मित्रपक्ष महायुतीच्या सरकारने पिंपरी-चिंचवडकरांसाठी नियमाच्या बाहेर जाऊन आंद्रा धरणातील २५० एमलडी पाणी मंजूर केले आहे. वाढणाऱ्या या शहराची गरज लक्षात घेऊन सरकारने हा निर्णय घेतला होता. हे पाणी हे पाणी लवकरच शहरापर्यंत पोहोचणार आहे. त्यातून या शहराची तहान भागवण्याचे काम निश्चितपणे पूर्ण केले जाणार असल्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरूवारी सांगवी येथील सभेत सांगितले. तसेच पोटनिवडणुकीत राष्ट्रवादीने उमेदवार उभा केला नसता तर त्यांचा मोठेपणा दिसला असता. पण आता ठीक आहे, दिवंगत लक्ष्मणभाऊंची काय ताकद आहे हे या निवडणुकीतून आम्ही दाखवून देऊ, असे आव्हान त्यांनी राष्ट्रवादीला दिले.



चिंचवड पोटनिवडणुकीतील भाजपच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या प्रचारार्थ सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदान येथे आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी भाजप-शिवसेना व मित्रपक्ष महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार श्रीरंग बारणे, धनंजय महाडीक, भाजपचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, आमदार शिवेंद्रराजे भोसले, आमदार राम सातपुते, उमा खापरे, श्रीकांत भारतीय, राम शिंदे, गोपीचंद पडळकर, अभिमन्यू पवार, तुषार राठोड, प्रसाद लाड, माजी मंत्री विजय शिवतारे, हर्षवर्धन पाटील, माजी खासदार अमर साबळे, भाजप महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ, माजी महापौर माई ढोरे, भाजपचे प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार, प्रदेश सचिव अमित गोरखे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष अमित गोरखे, आरपीआयच्या नेत्या चंद्रकांता सोनकांबळे, रासपचे शहराध्यक्ष भारत महानवर, प्रहारचे संजय गायके आदी उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, शहराच्या जडणघडणीत लक्ष्मण जगताप यांचा वाटा होता. ही निवडणूक आलीच नसती तर आपल्या सगळ्यांना आनंद झाला असता. परंतु, कधी कधी नियती आपल्यावर काही गोष्टी लादत असते. उमदा नेता, २४ तास विकासाची कास धरणारा, जनसामान्यांचा आवाज बनणारा नेता दुर्दैवाने आपल्यातून निघून गेले. निवडणूक अचानक आली. कोणाचीही मानसिक तयारी नव्हती. त्यांचे कार्य समर्थपणे नेण्यासाठी त्यांच्या मागे सावलीप्रमाणे उभ्या राहिलेल्या अश्विनी जगताप यांना उमेदवारी देण्याचा निर्णय पक्षाने घेतला. दुःखाच्या काळातही लक्ष्मणभाऊंचे कार्य पुढे नेण्यासाठी त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या.

आता मतदारांनी अश्विनी लक्ष्मण जगताप यांना आशिर्वाद देऊन लक्ष्मणभाऊंना श्रद्धांजली वाहावी. पोटनिवडणुकीत राष्ट्रवादीने उमेदवार उभा केला नसता, तर त्यांचा मोठेपणा दिसला असता. पण आता ठीक आहे, दिवंगत लक्ष्मणभाऊंची काय ताकद आहे हे या निवडणुकीतून आम्ही दाखवून देऊ. त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या जनतेने लक्ष्मणभाऊंच्या सावली असलेल्या अश्विनी लक्ष्मण जगताप यांना अभूतपूर्व विजय देणार आहे. लक्ष्मणभाऊ म्हणायचे पिंपरी-चिंचवड शहरामध्ये आंतरराष्ट्रीय शहर बनण्याची ताकद आहे. त्यासाठी ते झटत होते. शहरातील वेगवेगळ्या समस्या सोवडण्यासाठी पाठपुरावा करत होते.

शास्तीकर रद्द व्हावा यासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला. मोगलांच्या काळातील जिझिया करासारखा केवळ पिंपरी-चिंचवडकरांवर हा कर लावण्यात आला होता. लोकांना मोठ्या प्रमाणात नोटीस देण्यास सुरू केले होते. त्यावेळी काँग्रेस-राष्ट्रवादीचे शासन होते. त्यांना अचानक स्वप्न पडले आणि शहरात शास्तीकर लावला. पण भाजप-शिवसेना महायुती सरकारने एक हजार चौरस फुटांपर्यंतच्या घरांचा शास्तीकर रद्द केला. नंतर नवीन सरकार आल्यानंतर लक्षात आले की एवढ्याने नागरिकांची सुटका होत नाही. त्यामुळे शास्तीसारखा जिझिया कर संपूर्णपणे रद्द करण्याची घोषणा विधानसभेत केली आहे. त्याचा शासन आदेश काढला नाही, तर सरकारवर हक्कभंग येतो. त्यामुळे विधानसभेत केलेल्या घोषणेचा शासन आदेश काढावाच लागतो. केलेल्या घोषणेप्रमाणे नक्कीच शासन आदेश काढून शास्तीकर संपूर्णपणे रद्द करणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खासदार श्रीरंग बारणे, धनंजय महाडीक, भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांचीही भाषणे झाली.

# खलिस्तानला विरोध कराल तर इंदिरा गांधींप्रमाणे परिणाम भोगाल

## अमृतपाल सिंह याची अमित शाहांना थेट धमकी

**अमृतसर : वृत्तसंस्था**

पंजाबमधील 'वारीस पंजाब दे' संघटनेचा प्रमुख आणि खलिस्तान समर्थक अमृतपाल सिंहने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना थेट धमकी दिली आहे. खलिस्तानी चळवळीच्या विरोधात जाल तर इंदिरा गांधी यांना चुकवावी लागलेली किंमत तुम्हालाही चुकवावी लागेल अशी उघड धमकी त्याने दिली आहे. अमित शाह यांनी हिंदू राष्ट्राची मागणी करणाऱ्यांचं समर्थन केलं तर ते गृहमंत्रीपदावर कसे राहतील हेदेखील पाहून घेऊ असंही तो म्हणाला.



अमृतपालचा सहकारी लवप्रीत तुफान याच्या अटकेच्या निषेधार्थ त्याच्या समर्थकांनी अजनाळा पोलीस ठाण्याबाहेर गोंधळ घातला. या गोंधळावेळी सहा पोलीस गंभीर जखमी झाले असून, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अमित शाह यांनी खलिस्तानी चळवळ पुढे जाऊ देणार नाही असं म्हटलं होतं, इंदिरा गांधींनीही असंच म्हटलं होतं असं अमृतपाल सिंह म्हणाला. तसं खरंच काही केलं तर इंदिरा गांधींच्या प्रमाणे तुम्हालाही परिणाम भोगावे लागतील अशी धमकीच त्याने अमित शाह यांना दिली.

अमृतपाल सिंह म्हणाला की, ''जेव्हा लोक हिंदू राष्ट्राची मागणी करू शकतात तर आम्ही खलिस्तानची मागणी का करू शकत नाही. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी खलिस्तानला विरोध करण्याची किंमत मोजली. आम्हाला कोणीही रोखू शकत नाही, मग ते पंतप्रधान मोदी असोत, अमित शहा असोत किंवा भगवंत मान असोत.''

याआधीही अमृतपाल सिंहने एका कार्यक्रमात अमित शाह यांना धमकी दिली होती आणि पंजाबचा प्रत्येक तरुण खलिस्तानबद्दल बोलत असल्याचं वक्तव्य केलं होतं. आता तो म्हणाला की, ''इंदिरा गांधींनीही दबाव टाकला, त्याचा परिणाम काय झाला हे सर्वांना माहीत आहे. अमित शहा यांनीही त्यांची इच्छा पूर्ण करावी. आम्ही आमचं शासन मागत आहोत, दुसऱ्याचं नाही.''

गृहमंत्री अमित शहा यांनी नुकतीच खलिस्तान समर्थकांबाबत आपली भूमिका मांडली आहे. पंजाबमधील खलिस्तान समर्थकांवर सरकार लक्ष ठेवून आहे, असे ते म्हणाले होते.

**खलिस्तानी समर्थकांनी नाचवल्या नंग्या तलवारी**

अमृतपालच्या साथीदाराच्या अटकेच्या निषेधार्थ पंजाबमधील अजनाला पोलीस ठाण्यात पोहोचलेल्या समर्थकांनी नंग्या तलवारी आणि बंदुका नाचवल्या आणि पोलीस बॅरिकेड्स तोडले. अमृतपाल सिंगचा जवळचा सहकारी लवप्रीत तुफान याच्या अटकेच्या निषेधार्थ समर्थक पोलीस ठाण्याबाहेर जमले होते. सुधीर सुरी हत्येप्रकरणी पोलिसांनी हल्लेखोर संदीप सिंगला घटनेनंतर काही वेळातच अटक केली होती. त्याची कारही जप्त करण्यात आली आहे. आरोपींच्या गाडीवर खलिस्तानींचे पोस्टर चिकटवण्यात आले होते. याशिवाय संदीपच्या इन्स्टाग्राम आणि फेसबुकवरील नुकत्याच झालेल्या पोस्टवरून तो कट्टरपंथी असल्याचे समोर आले आहे. संदीप सिंगने अमृतपाल सिंगचे अनेक व्हिडिओ त्याच्या अकाउंटवरून पोस्ट केले होते. ज्यामध्ये खलिस्तान समर्थक नेत्याला भेटल्याचा व्हिडीओही होता.

# शिवसेनेचे सर्वाधिकार शिंदे यांच्याकडेच, पण...

- शिंदे पक्षप्रमुख नव्हे तर मुख्य नेतेपदी कायम

**मुंबई : प्रतिनिधी**

निवडणूक आयोगाने शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाणाचे पक्ष चिन्ह शिंदे गटाला बहाल केल्यानंतर प्रथमच झालेल्या शिवसेना कार्यकारिणी बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पक्षप्रमुख पद नव्हे तर मुख्य नेतेपदी कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

निवडणूक आयोगाच्या निर्णयानंतर प्रथमच झालेल्या कार्यकारिणीच्या अधिकृत बैठकीतील निर्णयांची माहिती शिवसेना नेते आणि मंत्री उदय सामंत यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

या बैठकीत एकनाथ शिंदे यांना मुख्य नेते पदी कायम ठेवण्यात आले आहे. पक्षात निर्णय घेण्याचे सर्वाधिकार शिंदे यांच्याकडेच असतील, असे सामंत यांनी यावेळी स्पष्ट केले. निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या नियमांच्या चौकटीतच सर्व निर्णय घेण्यात आल्याचे सामंत यांनी सांगितले.

या बैठकीत मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देणे, नोकऱ्यांमध्ये भूमिपुत्रांना ८० टक्के आरक्षण देणे आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांना मरणोत्तर भारतरत्न सन्मान प्रदान करणे, असे ठराव मान्य करण्यात आले आहेत.

# फडणवीस हे काळीज नसलेले राजकरणी

## सुषमा अंधारे यांचा भाजप नेत्यांवर हल्लाबोल

**पुणे : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे काळीज नसलेले राजकारणी आहेत. त्यांच्यामध्ये माणुसकीचा लवलेशही नाही. त्यामुळेच त्यांनी नाकात नळ्या असूनही ज्येष्ठ नेते खासदार गिरीश बापट यांना प्रचारासाठी बाहेर काढले, अशी कठोर टीका उद्धव ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केली.

कसबा विधानसभा पोटनिवडणुकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारासाठी आयोजित करण्यात आलेल्या सभेत अंधारे यांनी फडणवीस यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावरही हल्लाबोल केला.

फडणवीस हे सत्तेसाठी काहीही करणारे नेते आहेत. त्यासाठीच विधान परिषद निवडणुकीच्या वेळी आमदार मुक्ता टिळक आणि लक्ष्मण जगताप यांना स्ट्रेचरवर घालून मतदानासाठी आणण्यात आले. आताही बापट यांच्या बाबतीत तेच केले जात आहे, अशी टीका अंधारे यांनी केली.

चंद्रकांत पाटील यांनी कोल्हापुरातून येऊन माजी आमदार मेधा कुलकर्णी यांचा कोथरूड मतदारसंघ लाटला. तेच आता मुक्ता टिळक यांच्या बाबतीतही केले जात आहे, असे त्या म्हणाल्या. गृहमंत्री अमित शहा आपल्या वडिलांसारखे आहेत, या मुख्यमंत्र्यांच्या विधानाचाही त्यांनी समाचार घेतला. ५८ वर्षांच्या अमित शहा यांना ५९ वर्षाचा मुलगा कसा झाला, असा उपरोधिक सवाल त्यांनी केला.

# पुढील पाच दिवस तापमानाचा पारा वाढणार!

**पुणे : प्रतिनिधी**

अजूनही मार्च महिना सुरू झाला नसला तरी तापमानाचा पारा चांगलाच वाढला आहे. आता, आगामी पाच दिवस वातावरणातील उष्मा वाढणार असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. वायव्य, मध्य आणि पूर्व भारतात पुढील पाच दिवसात कमाल तापमान हे सामान्यपेक्षा तापमानापेक्षा तीन ते पाच अंशांनी जास्त असणार असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे.

देशाच्या अनेक भागांमध्ये आधीच अधिक तीव्रतेच्या तापमानाची नोंद होत आहे. साधारणपणे एवढे तापमान मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात नोंदवण्यात येते. त्यामुळे यंदाच्या वर्षी तीव्र उष्णतेची लाट येण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. आयएमडीने एका निवेदनात म्हटले आहे की, ''पुढील पाच दिवसांत वायव्य, मध्य आणि पूर्व भारतातील बहुतांश भागात कमाल तापमान सामान्यपेक्षा तीन ते पाच अंश सेल्सिअस जास्त राहण्याची शक्यता आहे.

# एमपीएससी विद्यार्थ्यांची मागणी मान्य, नवीन अभ्यासक्रम २०२५ पासून लागू होणार

**पुणे : प्रतिनिधी**

एमपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची मागणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून मान्य करण्यात आली आहे. नवीन अभ्यासक्रम २०२५ पासून लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मागील काही दिवसांपासून विद्यार्थ्यांकडून आंदोलन सुरू होते. राज्य लोकसेवा आयोगाने हा निर्णय जाहीर केल्यानंतर विद्यार्थ्यांकडून पुण्यातील झाशीची राणी चौकात जल्लोष साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाने याबाबतचा निर्णय ट्वीट करून जाहीर केला. राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या वर्णनात्मक स्वरूपाच्या परीक्षेसंदर्भातील उमेदवारांची मागणी, कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती व उमेदवारांना तयारीसाठी द्यावयाचा अतिरिक्त कालावधी विचारात घेऊन सुधारित परीक्षा योजना व अभ्यासक्रम सन २०२५ पासून लागू करण्यात येत असल्याचे आयोगाने म्हटले.

मागील अनेक वर्षांपासून पुण्यात किंवा राज्यभर विद्यार्थी राज्यसेवा परीक्षेचा अभ्यास करत आहेत. दोन वर्ष कोरोना असल्याने या विद्यार्थ्यांना काही प्रमाणात त्रास सहन करावा लागला होता. त्यानंतर परीक्षांच्या तारखा देखील लवकर जाहीर झाल्या नाहीत. या सगळ्यांमुळे विद्यार्थी संतापले होते. त्यानंतर नवा पॅटर्न लागू करणार असल्याने विद्यार्थी आक्रमक झाले होते.

सोमवारपासून (२० फेब्रुवारी) पुण्यातील झाशीची राणी लक्ष्मीबाई चौकात एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरु होते. गेल्या दोन महिन्यातील हे तिसरे आंदोलन होते. जानेवारीच्या अखेरीस विद्यार्थ्यांची मागणी मान्य करत सरकारनं नव्या परीक्षा पद्धतीची अंमलबजावणी पुढे ढकलली होती. मात्र, हा निर्णय घेऊन तीन आठवडे उलटले असूनसुद्धा या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्याने विद्यार्थी पुन्हा रस्त्यावर उतरले होते. सरकारने आश्वासन देऊनही आदेश न काढल्याबद्दल विद्यार्थ्यांनी संताप व्यक्त केला होता. विद्यार्थ्यांनी उपोषण आंदोलन सुरू केले होते.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मंगळवारी, २१ फेब्रुवारी रोजी रात्री उशिरा आंदोलनस्थळी जात आंदोलक विद्यार्थ्यांची भेट घेऊन चर्चा केली होती. विद्यार्थ्यांची मागणी योग्य असल्याचे त्यांनी म्हटले होते. आंदोलन स्थळावरून शरद पवार यांनी मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा केली होती. या विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळासोबत आपण मुख्यमंत्र्यांची भेट घेऊ असं सांगत त्यांनी हे आंदोलन मागे घेण्याचं आवाहन केलं होते.



शरद पवार यांच्या आवाहनानंतर विद्यार्थ्यांनी उपोषण मागे घेतले होते. मात्र, आंदोलनावर ठाम राहिले. अधिकृत घोषणा होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवणार असल्याची घोषणा त्यांनी केली होती. त्यानंतर आता, राज्य लोकसेवा आयोगाने नवीन अभ्यासक्रमानुसार २०२५ पासून परीक्षा घेणार असल्याची घोषणा केली आहे.

## एमपीएससी लढ्यातील यशाला नितीन आंधळे या प्रामाणिक उपोषणकर्त्याचा मोलाचा वाटा

**पुणे : प्रतिनिधी**

चार दिवसांपासून भव्यदिव्य आंदोलनाचं स्वरूप बालगंधर्व चौकात सुरु होते. अक्षरशः राजकिय मंडळींची भेटीगाठीसाठी रांग लागली होती. प्रश्न काही सुटत नव्हता, शासनकर्ता इच्छा असूनही सोडवत नव्हते, ही श्रेयवादाची लढाई काही प्रमाणात जोरात सुरु होती. आयोगाचा ताठरपणा तर शिगेलाच पोहचला होता.

नव्याजुन्या युवा नेत्याचा भरणा उपोषणापत अधिक वाढला होता. हजारोंच्या गर्दित हावसे,गवसे आणी नवसे सगळेच होते. यात प्रामाणिक, निष्ठावंत विद्यार्थीची संख्याही मोठी होती. शेवटच्या दिवशी म्हणजे आज संख्या फार घसरली होती. काही उरले नाही, असे असताना नितिन आंधळे यांनी आंदोलनात प्राण आणला. आणि हा निर्णय होत नाही तोपर्यत माघार घेणार नाही, अशी ठाम भुमिका त्यांनी घेतली. ती सर्व विद्यार्थ्यांच्या साथीने यशस्वी केली.

बऱ्याच जणांना माहीत नाही महाज्योती फेलोशीप साठी नितीनने तब्बल दोन महिने आझाद मैदान मुंबईत आंदोलन करत होता. अखेर निर्णय घेण्यास मागील शासनाला त्यांनी भाग पाडले होते. तो हाडाचा चिवट कार्यकर्ता आहे.

या आंदोलनात सर्व सामाजिक चळवळीतील, महाविकास आघाडीतील सर्वांनी हातभार लागले. माध्यमांनी हा विषय पुण्यात पोटनिवडणूक असूनही चर्चेमध्ये ठेवला. हा विजय विद्यार्थ्यांसह, सर्वांच्या एकजुटीचा, सहनशिलतेचा आहे.

# बाणेर, औंध, बालेवाडी विभागात उघड्यावर होतेय अन्नविक्री; हातगाड्यांवर तयार होणाऱ्या पदार्थांमध्ये रासायनिक घटकांचा वापर

■ अन्न व प्रशासन विभाग सुस्त ■ नागरिकांच्या आरोग्याला धोका ■ विषबाधा घडण्याचा प्रकार

**बाणेर, बालेवाडी : रमेश जयस्वाल**

बाणेर, औंध, बालेवाडी विभागात हॉटेल, धाबे, हातगाड्यांवर उघड्यावर अन्नपदार्थ ठेवून विकत आहेत. निकृष्ट तेलाचा वापर करून अन्नपदार्थ हातगाडीवर उघड्यावर ठेवून विकल्यामुळे विषबाधा होऊ शकते. या विभागात चौकाचौकात हातगाड्यावर अनेक ठिकाणी काळे तेल होईपर्यंत अन्नपदार्थ तळले जातात. अत्यंत बेजबाबदारपणे निकृष्ट प्रकारचे हे पदार्थ विकणारे व्यावसायिक जेवढे जबाबदार तेवढेच त्यांना पाठीस घालणारे अन्न व भेसळ प्रशासनाचे अधिकारीही जबाबदार आहेत. या दोघांचे वर्तन संशयास्पद आहे. हप्ते घेऊन या लोकांना पाठीस घालणारे अधिकारी यांना अन्नभेसळ प्रतिबंधक कायदा १९५४ आणि भेसळ प्रतिबंधक कायदा संसदेत पास झालेला कायदा याची कल्पना नाही काय? याचा वापर फक्त कागदावरच दिसतो. यानंतर १९७० च्या कायद्यानुसार काही ठिकाणी अंमलबजावणी केली जाते; परंतु अंमलबजावणी होतच नाही, ही शोकांतिका आहे.







न्यायालयाने पदार्थ उघड्यावर बनविण्यास बंदी घातली असतानाही राजेरोसपणे उघड्यावर अन्न बनविले जात आहे. वडापाव, पावभाजी, भेळवाले उघड्यावर अन्न ठेवत आहेत. रात्रीच्यावेळी भर चौकात हातगाड्या राजेरोसपणे लावलेल्या असतात. निकृष्ठ भेसळयुक्त तेलाच्या वापरामुळे चर्मरोग, पोटाचे विकार वाढत आहेत. फळे पिकविण्यासाठी विषारी रसायनाचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. या रासायनिक घटकामुळे खाणारांच्या शरीरावर अनिष्ट परिणाम होत आहे. हॉटेलवाले भाजीचा रस्सा आठ दिवस फ्रिजमध्ये ठेवून वापरतात. सांबार, चटणी, अद्रक, लसूण पेस्ट एकदा बनवून चार चार दिवस फ्रिजमध्ये ठेवून वापर केला जात आहे. अन्न भेसळ विभाग यांच्या फ्रिजची पाहणी करत नाहीत. पाणी साठवणूक टाकी, रांजण, ड्रममध्ये केली जाते. याची कधी सफाई होत नाही. शेवाळयुक्त पाण्याचा वापर केला जातो. ग्राहकांना दूषित पाणी पाजण्याचा प्रकार घडत आहे.

अनेक हॉटेलमध्ये, चायनिज हॉटेलात टेस्टिंग पावडरचा वापर होत आहे. भाजी कशीही बनो या पावडरचा वापर केल्यास भाजीला चव येते; परंतु ही पावडर शरीराला घातक असून यामुळे हाडे खिळखिळे होतात, तर रस्सा घट्ट करण्यासाठी कॉर्नफ्लावरचा वापर केला जातो. प्रत्यक्षात ही पावडर शरीरात गेल्यास शरीरातील पाणी ओढण्याची शक्ती या पावडरमध्ये आहे. अनेक पेयात कार्बोहायड्रेटचा वापर प्रचंड प्रमाणात करण्यात येतो. प्रिझर्व्हेटिव्ह, आडटिव्ह, सायट्रीक ॲसिड, सनसेटयलो, साक्रिन आणि नोमोटो सारखे द्रव्य मुलांना अपायकारक असतानाही यांचा वापर रोजेरोसपणे केले जातो.

ब्रेडमध्ये पीठ आवळताना फेरस सल्फेट, कॅल्शीयम सल्फेट, थियामीन, ब्रोमेट हे रासायनिक पदार्थ वापरतात. हे शरीराला घातक पदार्थ आहे. ब्रेड नरम राहावा म्हणून बेन्झाईल, परॉक्साईड, ॲसिटोनसारखे रासायनिक घटक राजेरोसपणे वापरत आहेत. झटपट नफा कमविण्याच्या नादात जनतेच्या आरोग्याशी खेळण्याचा प्रकार घडत आहे. हा भेसळीचा भस्मासूर त्वरीत थांबविण्याकरिता अन्न भेसळ प्रशासनाने कठोर पावले उचलावीत, अशी जनतेची मागणी आहे. उघड्यावर अन्न बनविणारे आणि विकणारे तसेच रासायनिक घटक वापरणारे एखाद्या वेळेस भयंकर विषबाधेचा बळी घेतील हे निश्चित.

अन्न भेसळ प्रशासनाने बघ्याची भूमिका न घेता व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करून संबंधितांचे परवाने रद्द करावेत. ज्यांच्याकडून हप्ते मिळत नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्यात येते. नागरिकांच्या आरोग्य रक्षणाकरिता कठोर पावले उचलण्यात येत नाहीत. बघ्याची भूमीका न घेता प्रत्येकाची तपासणी करण्यात येवून कठोर कारवाई करण्याची मागणी जनतेतून होत आहे.

## केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या वक्तव्याचा माळशिरस तालुका उद्धव ठाकरे गटाच्या वतीने निषेध



**अकलूज : प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कोल्हापूरमध्ये जे वक्तव्य केले, त्या वक्तव्याचा शिवसेना उद्धव ठाकरे कार्यकर्त्यांच्या गटाने माळशिरस तालुक्याच्या वतीने निषेध केला.

यावेळी कार्यकर्त्यांनी म्हटले आहे की, सत्तेच्या मस्तीमध्ये उध्दव बाळासाहेब ठाकरे यांचेविषयी अत्यंत खालच्या भाषेत टीका केली. त्यामुळे समस्त शिवसैनिकांच्या भावना दुखावल्या आहेत. म्हणून जिल्हाप्रमुख संभाजीराजे शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली शिवसेना उद्धव ठाकरे गटाने माळशिरस तालुका यांच्यावतीने अमित शहा यांचेवर गुन्हा दाखल करण्यासाठी अकलूज पोलीस स्टेशनला निवेदन देण्यात आले.

त्यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख संतोष राऊत, तालुका उपप्रमुख महादेव बंडगर, ग्राहक संरक्षण कक्ष तालुका प्रमुख उमेश जाधव, शिवसेना अकलूज शहर प्रमुख अनिल बनपट्टे, युवासेना शहर प्रमुख शेखर खिलारे, बागेवाडी ग्रामपंचायत सदस्य संजय कांबळे, कांग्रेस शहर अध्यक्ष नवनाथ साठे, लक्ष्मण तात्या डोईफोडे व अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

# चिंचवड मतदारसंघात भाजपच्या अश्विनी लक्ष्मण जगताप यांचा विजय निश्चित

■ मुख्यमंत्र्यांनी आधीच केले त्यांचे अभिनंदन

**पिंपरी : प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजप-शिवसेना व मित्रपक्ष महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांचा विजय निश्चित मानला जात आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे निवडणूक निकालाच्या आधीच अभिनंदन केले आहे. मतदारांचा कल पाहता अश्विनीताई तुम्ही रेकॉर्ड ब्रेक मताधिक्याने निवडून येणार ही काळ्या दगडावरची भगवी रेघ असल्याचा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला आहे. तसेच विजयी सभेच्या रॅलीला मलाही बोलवा, अशी सूचना त्यांनी केली आहे.



भाजप, शिवसेना, रिपब्लिकन पक्ष (आठवले गट), रासप, रयत क्रांती संघटना, शिवसंग्राम संघटना, प्रहार संघटना महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या प्रचारार्थ रहाटणीतील शिवेंद्र लॉन्समध्ये आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी अश्विनी लक्ष्मण जगताप, खासदार श्रीरंग बारणे, भाजप शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे, भाजपचे प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप, रिपब्लिकन पक्ष आठवले गटाच्या राज्याच्या नेत्या चंद्रकांता सोनकांबळे, शहराध्यक्ष स्वप्निल कांबळे, प्रहारचे संजय गायखे, राष्ट्रीय समाज पक्षाचे शहराध्यक्ष भारत महानवर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शहप्रमुख तरस यांच्यासह महायुतीतील सर्व पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काल झालेल्या मुख्यमंत्र्यांच्या सभेला नागरिकांची तुफान गर्दी होती. त्यापूर्वी मुख्यमंत्र्यांनी वाकडपासून काढलेल्या रोड शोलाही नागरिकांचा तुफान प्रतिसाद मिळाला. त्यामुळे सभेत बोलताना मुख्यमंत्र्यांनी रोड शो दरम्यान दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्याविषयी नागरिकांच्या चेहऱ्यावर दिसणाऱ्या प्रेमाचा आणि आदराचा आवर्जून उल्लेख केला. मुख्यमंत्री असल्यामुळे या मतदारसंघाच्या निवडणुकीत काय होणार हे मला आधीच माहित असल्याचे ते म्हणाले. मतदारसंघातील मतदारांचा कल भाजप-शिवसेना महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या बाजूने असल्याचे त्यांनी सांगितले.

अश्विनीताई तुम्ही रेकॉर्ड ब्रेक मताधिक्याने निवडून येणार ही काळ्या दगडावरची भगवी रेघ असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच निवडणुकीतील विजयासाठी अश्विनी लक्ष्मण जगताप यांचे आधीच अभिनंदन मुख्यमंत्र्यांनी केले. तसेच विजयी सभेच्या रॅलीला मलाही बोलवा, असे ते मिश्किलपणे बोलले. तुम्ही अश्विनीताईंना एक लाखाचे मताधिक्य देणार का?, असा जाहीर प्रश्न त्यांनी सभेला उपस्थित प्रचंड गर्दीला केला. त्यांच्या या प्रश्नाला नागरिकांनी हो असे उत्तर देऊन जोरदार प्रतिसाद दिला. खुद्द मुख्यमंत्र्यांनीच अश्विनी लक्ष्मण जगताप यांचे आधीच विजयासाठी अभिनंदन केल्याने महायुतीमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. महायुतीतील सर्व नेते, आमदार, खासदार, मंत्री, माजी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते चिंचवड पोटनिवडणुकीत प्रचंड कष्ट घेत असल्यामुळे अश्विनी लक्ष्मण जगताप यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

# वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी अतिक्रमणे हटवण्याची मागणी

## वाहतूक सल्लागार समितीच्या बैठकीत सदस्यांची चर्चा

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा शहरातील वाहतुकीची कोंडी हटवण्यासाठी शहराच्या प्रत्येक चौकातील अतिक्रमणे ही पन्नास मीटर मागे हटवण्यात यावीत त्याशिवाय ही वाहतूक कोंडी सुटणे शक्य नाही अशी सूचना वाहतूक सल्लागार समितीच्या बैठकीत करण्यात आली. याशिवाय या बैठकीमध्ये वाहतुकीसह शहरातील दळणवळण सुलभ ही करण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

या बैठकीमध्ये वाहतूक सल्लागार समितीचे समन्वयक प्रकाश गवळी, सदस्य केदार नाईक,संदीप भट्ट, नीलकंठ पालेकर, राजेंद्र रानडे, जयदीप ठुसे, राजेंद्र आपटे, राजेंद्र खंडेलवाल, महेश लोया, विकास बनकर, नरेंद्र पाटील, अविनाश कदम व व्यापारी वर्ग उपस्थित होते ही बैठक व्यापारी सहकारी पतसंस्थेच्या दालनामध्ये झाली.

सातारा शहरातील साधन सुविधा आणि त्यांचा विकास यांचा समन्वय साधण्याकरता मुळात समस्या काय आहेत हे जाणून घेऊन त्यावर उपाययोजना होणे गरजेचे असल्याचे स्पष्ट मत प्रकाश गवळी आणि नरेंद्र पाटील यांनी मांडले .वाहतूक सल्लागार समितीच्या बैठका प्रत्येक महिन्यात घेण्यात याव्या शहरातील प्रत्येक चौकातील रस्त्यावरील अतिक्रमणे ५० मीटर पर्यंत हटवली जावीत जेणेकरून वाहन चालकास ट्राफिक जामची समस्या होणार नाही, शहरातील व्यापारी लोकांच्यासाठी मासिक पास देऊन मंगळवार तळे परिसरातील मंडईच्या खालील पार्किंग जागा उपलब्ध करून देण्यात यावी गुरुवार परजावरील रिकाम्या जागेत बहुमजली पार्किंग व्यवस्था करण्यात यावी, राजवाडा येथील जनावरांचा दवाखाना व प्रतापसिंह उद्यानाचा रिक्त भागात बहुमली पार्किंग उभारण्यात यावी, शहराच्या मुख्य चौकातील बंद सिग्नल सुरू करण्यात यावे ,५०० पाटील जुना मोटर स्टँड चौकात नो एन्ट्री काढून प्रवेशास मंजुरी द्यावी, एसटी स्टँड तहसीलदार कार्यालय या रस्त्यावरील अतिक्रमणे फुटपाथ मोकळे करण्यात यावेत आणि दुकानदारांचे फलक ही हटवले जावेत पार्किंग झोनची निर्मिती करण्यात यावी, अनेक भाजीवाले फळ विक्रेते रस्त्याच्या दोन्ही बाजूस पार्किंग झोन अडवून बसतात त्यांची योग्य ती व्यवस्था करावी, जिल्हा परिषद व राधिका रोड या ठिकाणी हॉकर साठी आरक्षित जागा देण्यात यावी, देवी चौक ते राजवाडा रस्त्यावरील फुटपाथची रुंदी कमी करून रस्ता मोठा केला जावा, पार्किंगला जागा उपलब्धता तिचा अडथळा कमी होणार आहे ,ट्रॅफिक पोलीस यांची वर्दळीच्या चौकामध्ये योग्य वेळी योग्य ठिकाणी नेमणूक करण्यात यावी सातारा मध्यवर्ती बस स्थानकाच्या परिसरात वाहतूक नियमानापेक्षा विनापरवाना वाहनांवर कारवाई करण्याचे जास्त काम होते त्याला प्रतिबंध करण्यात यावा, ट्राफिक पोलिसांची संख्या पाहता कोठेही वाहतुकीचे नियंत्रण करताना दिसत नाही उलट कराड रस्त्यावर पुणे रस्त्यावर शहराच्या हद्दीवर वाहने अडवण्याचे काम होऊन गैरप्रकार केले जातात .गेल्या अनेक वर्षापासून प्रत्येक मीटिंगमध्ये एसटी बसेस ना पर्यायी मार्ग काढून देण्यात यावा जेणेकरून पोवई नाका ते हुतात्मा स्मारक रस्त्यावरील वाहतूक कमी होईल तसेच मध्यवर्ती बस स्थानकाच्या पूर्व दिशेला पारंगे चौकाकडे जाणारे आउट गेट बनवण्यात यावे इत्यादी पंधरा विषयांवर सविस्तरपणे चर्चा करण्यात आली.

या सर्व चर्चेचा मसुदा तयार करून त्याचे निवेदन माननीय खासदार उदयनराजे भोसले आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी नगरपालिकेची मुख्याधिकारी अभिजीत बापट यांना सादर करण्यात येणार आहे या सर्व उपाययोजना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून मंजूर करून त्याची अंमलबजावणी तात्काळ केली जावी अशी मागणी करण्यात येणार असल्याचे प्रकाश गवळी यांनी सांगितले.

# तंबाखू मुक्तीसाठी जनजागृती महत्त्वाची - निवासी उपजिल्हाधिकारी प्रशांत आवटे

## साताऱ्यात तंबाखू विरोधी जनजागृती अभियानाचा शुभारंभ

**सातारा : प्रतिनिधी**

तंबाखूचे दुष्परिणाम आणि वाढते कॅन्सरचे प्रमाण रोखण्यासाठी प्रभावी जनजागृती व लोकसहभाग महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी प्रशांत आवटे यांनी केले. साताऱ्यात तंबाखू विरोधी जनजागृती अभियानाचा शुभारंभ श्री. आवटे यांच्या हस्ते चित्ररथाचे उद्घाटन व कोटपा २००३ कायद्याच्या फलकाचे अनावरण करुन करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी विभागीय अधिकारी रंगनाथ जोशी, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाच्या सल्लागार डॉ. दिव्या परदेशी-कोठेकर, मानसशास्त्रज्ञ दीपाली जगताप आदी उपस्थित होते.

तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम आणि त्याचा भावी पिढीवर होणारा दुष्परीणाम याविषयी जनजागृती करण्यात येणार असल्याचे सांगून निवासी उपजिल्हाधिकारी श्री. आवटे म्हणाले, लोकांना तंबाखूच्या सेवनापासून परावृत्त करण्याचा हा एक स्तुत्य प्रयत्न आहे. सर्व शासकीय कर्यालये, शैक्षणिक संस्थांच्या परिसरामध्ये शासन धोरणानुसार तंबाखू सेवनावरील व विक्री विषयीच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे धोरण आहे. तसेच शासकीय कार्यालयांमध्ये तंबाखूचे सेवन केले जाणार नाही याविषयी प्रबोधनही या आभियानाच्या माध्यमातून केले जाणार आहे.

या अभियानास सर्व शासकीय कार्यालये तसेच शैक्षणिक संस्थांनी सक्रीय सहकार्य करावे असे आवाहनी त्यांनी केले.

सातारा जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाचा तंबाखू नियंत्रण कक्ष व मराठवाडा ग्रामीण विकास संस्था औरंगाबाद यांच्या वतीने सातारा शहरात तीन दिवस चित्ररथाच्या माध्यमातून जनजागृती अभियान राबवण्यात येत आहे.

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा वडूज येथे 'रास्ता रोको'

**वडूज : प्रतिनिधी**

वडूज-पुसेगाव रस्त्यावर उतरून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते आज आक्रमक झाले. आज बारावीच्या परीक्षेसाठी सर्व विद्यार्थी परीक्षा केंद्रात गेल्यानंतर शेतकऱ्यांनी आंदोलन केले.अत्यंत शांततेत आंदोलन करण्यात आल्याने सर्वांनीच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आभार मानले.

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीज तोडणी, ऊस तोडणी मुकादमकडून होणारी फसवणूक, एकरकमी एफ.आर. पी.देणे. शेतक-यांना दिवसा किमान दहा दिवस वीज द्या , किमान हमीभावाचा कायदा लागू करा. शेतक-यांना दिवसा वीज द्या. पिकविमा तातडीने खात्यावर जमा करा. नियमित कर्ज भरणार्या शेतकर्यांना पन्नास हजार रुपये दिले पाहिजे. अशा मागण्यांचे निवेदन रस्त्यावरच खटावचे नायब तहसिलदार सचिन कर्णे यांना देण्यात आले.यावेळी शेतकरी व कार्यकर्त्यानी जोरदार घोषणाबाजी केली.

सध्या उन्हाळा सुरुवात झाला आहे. विहिर व हातपंपमध्ये पाणी आहे मात्र, विजेची जोडणी तोडणी जात असल्याने पिके वाळली आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातल्या प्रत्येक विभागात शेतकऱ्यांचे वेगवेगळे प्रश्न आहेत. सत्तेशिवाय कुणालाही काही देणेघेणे नाही, त्यामुळे खटाव तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटना रस्त्यावर उतरली आहे.एफ. आर. पी.प्रमाणे कोणताच साखर कारखाने शेतकऱ्यांच्या ऊसाला दर देत नाहीत. ऊसाची मोळी आल्यानंतर काही साखर कारखाने काटामारी करतात.त्या समस्या सोडवल्या जात नाहीत.



कृषी संजीवनी योजनेची मुदत वाढ दि.३१ मार्चपर्यंत देऊन फक्त पन्नास टक्के वीज बिलातून शेतकऱ्यांना मुक्त करावे. काही ऊस तोडणी कामगार ऊसाची तोडणी वेळी लूट करत आहेत. ऊस गेल्यानंतर दोन दोन महिने शेतकऱ्यांना एफ.आर. पी.नुसार उसाचे पेमेंट मिळत नाही. अशा आशयाचे निवेदन देण्यात आले आहे.

बुलढाणा येथे आंदोलक शेतकऱ्यांवर अमानुष लाठीचार्ज ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी केला त्यांची खातेनीहाय चौकशी करावी. रविकांत तुपकर यांना ताब्यात घेतलं आणि न्याय पद्धतीनं मागण्या मांडणाऱ्या शेतकऱ्यांच्यावर लाठी चार्ज केला. शिंदे -फडणवीस युतीचे सरकार पोलिसांच्या माध्यमातून शेतकऱ्यावर ज्या पद्धतीने लाट्याला करून त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे या गोष्टीचा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने निषेध व्यक्त केला आहे. सोयाबीन ,कपाशी, कांदा ,द्राक्ष यासारख्या अनेक पिकांचे बाजारभाव पडले आहे सरकारने हस्तक्षेप करून हे बाजारभाव पूर्ववत करण्यासाठी हस्तक्षेप करून प्रयत्न करावे. असे ही शेतकऱ्यांनी सांगितले.

यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे खटाव तालुक्यातील पदाधिकारी-शेतकरी संघटनेचे नेते व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. खटाव-माणचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ निलेश देशमुख, स. पो. नि. दत्तात्रय दराडे, पोलीस उपनिरीक्षक शितल पालेकर,दिपक देवकर, रमेश बर्गे, संदीप शेडगे आदी पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# सहकार महर्षींच्या ९८ सभासदांना १ कोटी ८ लाख रुपये विमा रक्कम वितरीत

**अकलूज : प्रतिनिधी**

ऊस ऊत्पादक सभासद हा महत्वाचा घटक मानुन सहकार महर्षि कारखान्याने जनता वैयक्तिक अपघात विमा योजना अंतर्गत सभादांचा विमा ऊतरविला होता.यामध्ये ९८ सभासदांना १ कोटी ८ लाख ४४ हजार रुपयांची विमा रक्कम कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांचे हस्ते वितरीत करण्यात आले.

सभासद आपल्या शेतामध्ये काम करित असताना वीज, सर्पदंश, प्राण्यांपासून होणारे हल्ले यामुळे मृत्युमुखी पडू शकतो ,अपंगत्व येते,प्रसंगी मृत्युही येवू शकतो. कर्ता मनुष्य मृत्युमुखी पडल्याने सभासदांच्या कुटूंबियावर मोठा आघात होवुन कुटुंब ऊध्वस्त होत असते. असे होवु नये कुटुंबीयांना सावरण्यासाठी सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सह.साखर कारखान्याने १४ आगस्ट २०२२ ते १३ आगस्ट २०२५ कालावाधीसाठी १७० रुपये प्रती सभासद प्रमाणे १०४१४ सभासदांचा दि.ओरीएटंल इन्शुरन्स कं.इंदापुर यांचे वतीने विमा ऊतरविण्यात आला होता. त्या अंतर्गत सन १९९९ ते चालु २०२३ पर्यंत ९८ सभासदांना १०८.४४ लाख रुपयांची विमा रक्कम मिळाली आहे.



यामध्ये कै. जनार्दन रंगनाथ भांगे रा माळखांबी वय वर्ष ५५ आपघाती मृत्यु दि. २२/०१/२०२२ त्यांचे वारस पत्नी श्रीमती सुशीला जनार्दन भांगे रक्कम रुपये ३.००लाखाचा चेक अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांचे हस्ते अदा करण्यात आला.तसेच कै. श्रीरंग दामु हांगे रा लाखेवाडी वय वर्ष ६६ आपघाती मृत्यु दि.११/११/२०२२ त्यांचे वारस पत्नी श्रीमती कांताबाई श्रीरंग हांगे विमा क्लेम रक्कम रुपये ३.०० लाखाचा चेक आदा करण्यात आला.

सदर विमा योजनेमध्ये अपघाती मृत्यू (रोड अक्सिडेंट, विजेचा शॉक, विहिरीत पडुन मृत्यु, सर्पदंश, दंगाधोपा प्राण्यापासून हल्ला झाल्यास), अपघातामुळे १००% अपंगत्व आल्यास अपघातामध्ये दोन आवश्यक अवयव यांना कायमचे अपंगत्व (डोळा, हात, पाय, यापैकी दोन ) आल्यास ४ अपघातामध्ये एका अवयवाचे कायम अपंगत्व(डोळा, हात, पाय, यापैकी एक) आल्यास संपुर्ण विमा रक्कम, एका अवयवाला अपंगगत्व आल्यास ५० टक्के रक्कम मिळणार असुन त्यासाठी १८ ते ७० वयोमर्यादा असुनविमा पॉलिशी रक्कम ३ लाख आहे. त्यास १७० रुपयांचा विमा हप्ता असल्याचे कारखाना व्यवस्थापनाने सांगितले.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले.
※ संपादक - नरेश विठ्ठल देसाई ※ दूरध्वनी पुणे - (०२०) २६९०९०३१ ※ इमेल - rajdand.pune@gmail.com *Declaration No.* : SDM/SR/07/2023

# काहींना चाळीस हजारात घरकुल; मग आम्हालाच सात लाख का?

## झोपडपट्टीवासियांचा सवाल : जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**सातारा : प्रतिनिधी**

सदर बझार, केसरकर पेठ येथील झोपडपट्टीवासियांना तीस ते चाळीस हजार रुपये भरून घरकुल मिळाले. मग आमच्याकडून सात लाख रुपये का आकारले जात आहे. इतके पैसे आमच्याकडे असते तर आम्ही झोपडीत राहून धुणी-भांडी का केली असती? असा सवाल उपस्थित करत मतकर झोपडपट्टी येथील रहिवाशींनी गुरुवारी सकाळी पालिका प्रशासनाच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला.

याबाबत जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मतकर, गेंडामाळ झोपडपट्टीत अनेक कष्टकरी कुटुंब राहत आहेत. वीज, पाणी अशा कोणत्याही सुविधा नसताना झोपडपट्टीवासियांनी कचऱ्यात आपला संसार उभा केला. पालिकेच्या वतीने २०१६ रोजी प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेसाठी झोपडपट्टीचा सर्व्हे करण्यात आला. येथील रहिवाशांकडे काय आहे काय नाही, याच्या नोंदी घेण्यात आल्या. यावेळी ३० हजार रुपये भरून हक्काचे घरकुल मिळेल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले. मात्र, यानंतर घरकुलाबाबत कोणतीही चर्चा झाली नाही.

२०२१ रोजी झोपडपट्टीत घरकुल योजनेचे काम प्रत्यक्षात सुरू करण्यात आले. यानंतर पालिका प्रशासनाकडून घरकुलाची किंमत सात लाख रुपये सांगण्यात आली. ही रक्कम ऐकूण झोपडपट्टीवासियांच्या पायाखालची जमीनच सरकली. घरकुलासाठी सात लाख रुपये कर्ज दिले जाईल, असे सांगण्यात आले असले तरी धुणी-भांडी करून घरखर्च चालविणारी गरीब कुटुंबं कर्जाचा हप्ता भरणार तरी कोठून? प्रशासनाने घरकुलासाठी निर्धारीत केलेली रक्कम आम्हाला मान्य नाही. प्रशासनाने आमच्या मागणीचा गांभिर्याने विचार करावा, अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा निवेदनात दिला आहे.




मोर्चात शहर सुधार समितीच्या पूजा बनसोडे, सिमा कीर्दत, माया कांबळे, उषा गायकवाड, पल्लवी काकडे, गायत्री जाधव, रेणुका पवार, सुरेखा भिंगारे, छाया मोरे शिवेंद्रसिंहराजे समर्थक सचिन कांबळे, मिलिंद कांबळे, रवी शेडगे आदींनी सहभाग घेतला.

# तोतया पोलीस अधिकाऱ्यास अटक

■ **वडूज पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी**

**वडूज : प्रतिनिधी**



मागील काही दिवस वडूज परिसरात पोलीस अधिकारी असल्याची बतावणी करून हात चलाखीने सोन्याचे दागिने व रोख रक्कम पळवून नेण्याचं प्रमाण वाढले होते. मंगळवार दि. २१ रोजी कांदा बटाटा व्यापारी प्रकाश बनकर यांना पोलीस अधिकारी असल्याची बतावणी करून हातचलाखीने त्यांच्या कडून सुमारे साडे दहा तोळे सोने एका तोतया पोलिस अधिकाऱ्याने लंपास केले होते. त्या अनुषंगाने पोलिसांनी शोध मोहीम सुरू केली होती. या दरम्यान वडूज पोलिसांनी वडूज-कराड रोड लगत असणाऱ्या ब्लु डायमंड हॉटेल नजीक तोतया पोलीस अधिकाऱ्यास सापळा लावून अलगद जाळ्यात पकडला.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, बुधवार दि. २२ रोजी दीड वाजण्याच्या सुमारास वडूज-कराड रोडलगत असणाऱ्या ब्लु डायमंड नजीक एक पोलीस अधिकाऱ्यांच्या वेशातील इसम वाहने अडवून चालकांची वाहन तपासणी करत आहे अशी गोपीनिय माहिती मिळाल्याने महिला पोउनि शितल पालेकर, पोना दीपक देवकर पोकॉ संदीप शेडगे, दर्याबा नरळे, सूर्यवंशी, यांनी वडूज-कराड रोड ने जाऊन मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने आपली वाहने अलीकडेच उभी करून पायी चालत जाऊन पाहणी केली असता एक पोलीस अधिकारी वेशातील एक इसम त्यांची स्प्लेंडर मोटार सायकल नंबर MH 11 AC 5426 ही रस्त्याच्या कडेला उभी करून रस्त्याने येण्या-जाणारे वाहनांना थांबण्याचा इशारा करीत असल्याचा दिसला. म्हणून त्याच्या जवळ जाऊन त्याचे नाव गाव विचारता त्याने मी विशाल संजय पाटील एपीआय असे सांगितले. त्यास साहेब आपण कोठे नेमणुकीस आहात. असे विचारले असता तो चाचपडला म्हणून त्याला ओळखपत्र दाखविण्यास सांगितले असता तो पळून जाऊ लागला. सापळा रचलेल्या पोलिसांनी त्याचा पाठलाग करून पकडले व ताब्यात घेतले असता त्याने निलेश सुरेश चव्हाण रा. वडगाव हवेली ता. कराड जि . सातारा येथील असल्याचे सांगितले. तसेच मी कोठेही पोलिस दलात नोकरीस नसल्याचे सांगितले असता त्याला वडूज पोलिसांनी अटक केली आहे.

याबाबत फिर्याद पोकॉ बापू शिंदे यांनी वडूज पोलिस ठाण्यात दिली आहे. याबाबत अधिक तपास महिला पोना अश्विनी काळभोर करीत आहे.

# सातारा-लातूर महामार्गाचे रखडलेले काम पूर्ण करा, अन्यथा 'रास्ता रोको'

## मनसेचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांचा इशारा

**दहिवडी : प्रतिनिधी**

सातारा-लातूर महामार्गावरील रखडलेल्या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक झाली आहे. जनतेसाठी त्रासिक बनलेल्या या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण न केल्यास रास्ता रोकोसह संबंधितांना रस्त्यावर फिरकू देणार नसल्याचा इशारा जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी दिला आहे. याबाबतचे लेखी निवेदन माणचे तहसीलदार यांना देण्यात आले आहे.



महाराष्ट्रातील मुख्य तिर्थक्षेत्रांपैकी महत्वाच्या असलेल्या गोंदवले बुद्रुकमध्ये महामार्गाचे काम रखडले आहे.याठिकाणच्या श्री ब्रह्मचैतन्य महाराज समाधी मंदिराला लागूनच रस्ते विकास महामंडळाच्या ताब्यातील हा महामार्ग गेला आहे. परंतु येथील मुख्य चौकातच रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षांपासून रखडले आहे. रस्त्याच्या कामासाठी पूर्वीचा रस्ता पूर्णपणे उखडून टाकल्यामुळे भाविकांसह,व्यापारी,विद्यार्थी व ग्रामस्थांना धुळीसह चिखलाचा व रस्त्यावरील खड्डयांचा नाहक त्रास सोसावा लागत आहे.याबाबत संबंधित विभागाला बऱ्याचदा सांगूनही या कामाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून जनतेला वेठीस धरले जात असल्याचा आरोप मनसेचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी केला आहे.

या रस्त्याचे काम या महिनाअखेर पूर्ण करावे किंवा पूर्वीप्रमाणेच हा रस्ता डांबरीकरण करून लोकांची गैरसोय दूर करावी. रस्त्याला लागूनच तीर्थक्षेत्र व शाळा असल्याने या रस्त्यावर गतिरोधक टाकण्याबाबत अनेकदा सांगून व ठराव देऊनही टाळाटाळ केली जात आहे. ही कामे तातडीने मार्गी न लावल्यास येत्या दोन मार्चला गोंदवल्यातील मुख्य चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. तसेच या रस्त्यावर संबंधित कंपनीची वाहने जिल्ह्यात कोठेही फिरू देणार नसल्याचा इशारा देण्यात आला आहे.यावेळी मनसे विद्यार्थी सेनेचे सातारा जिल्हाध्यक्ष सागर कट्टे, निलेश कट्टे, विशाल कट्टे, धिरज कट्टे, विश्वराज कट्टे, प्रथमेश नवले, लखन पारसे, विठ्ठल जाधव, युवराज पाटिल, आशुतोष कट्टे, रोहित कट्टे, रणजित पडमलकर, प्रतीक सत्रे, रणजीत जाधव उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीच्या विनयभंगासह एकास मारहाण केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा

सातारा : अल्पवयीन मुलीच्या विनयभंगासह एकास मारहाण केल्याप्रकरणी चौघांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक २३ डिसेंबर २०२२ ते २१ फेब्रुवारी २०२३ पर्यंत सातारा शहरा नजीकच्या एका उपनगरात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीस वारंवार त्रास देऊन, तिची बदनामी करून तसेच तिला मारहाण करून तिचा मित्र अथर्व काटकर यासही मारहाण केल्याप्रकरणी प्रथमेश प्रशांत माने रा. धनगरवाडी सातारा, अली शेख (पूर्ण नाव व पत्ता माहित नाही) आणि त्यांच्या सोबतच्या अनोळखी दोघाजणां विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी करीत आहेत.

# पोलीस असल्याची बतावणी करून वृद्धाची सुमारे तीन लाखांची फसवणूक

**सातारा : प्रतिनिधी**

पोलीस असल्याची बतावणी करून अज्ञात भामट्याने वृद्धाची सुमारे तीन लाखांची फसवणूक केली असल्याची तक्रार वडूज पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २१ फेब्रुवारी रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास प्रकाश ज्ञानेश्वर बनकर रा. वडूज, ता. खटाव हे वडूज शहरातून किराणामाल घेऊन घरी जात असताना पाठीमागून एक चॉकलेटी रंगाचा शर्ट घातलेला, डोक्यात हेल्मेट व तोंडास काळ्या रंगाचा मास्क घातलेल्या एका ४० ते ४५ वर्षाच्या माणसाने पाठीमागून येऊन बनकर यांना थांबवले आणि त्यांना म्हणाला, मी पोलीस अधिकारी आहे. मी तुम्हाला आवाज देतोय तुम्ही का थांबत नाही? तुम्ही पोलिसांना किंमत देत नाही. पुढे पोलिसांची चेकिंग चालू आहे, असे म्हणत रस्त्यावर अगोदरच थांबलेल्या एकास या भामट्याने बोलवून घेऊन त्याच्याकडील साहित्य मागून घेतले. त्यानंतर तो बनकर यांना म्हणाला की, तुमच्या गळ्यातील चेन व बोटातील अंगठ्या आणि खिशातील पैसे काढा, मी तुमच्याकडे रुमालात व्यवस्थित बांधून देतो. तो असे म्हणल्यावर बनकर यांनी त्यांच्या गळ्यातील चेन, अंगठ्या, घड्याळ व पैसे रुमाला मध्ये ठेवून त्याच्या जवळ न देता बनकर त्याला म्हणाले की राहू दे मी माझा रुमाल ठेवतो. त्याच वेळेस संबंधित भामटा अतिशय जलद गतीने बनकर यांच्या जवळून मोटरसायकल वरून निघून गेला. त्यानंतर बनकर यांनी रुमाल खोलून पाहिले असता त्यामध्ये त्यांची सुमारे ७५ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन, ३० ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या असे एकूण ३ लाख १० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल भामट्याने लंपास केला असल्याची बनकर यांची खात्री झाली.

याबाबत अज्ञात तोतया पोलीस अधिकाऱ्यावर वडूज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार ओंबासे करीत आहेत.

## नकली नंबर प्लेट वापरल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** नकली नंबर प्लेट तयार करून वापरल्याप्रकरणी एकावर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २ सप्टेंबर २०२२ ते ५ फेब्रुवारी २०२३ दरम्यान प्रदीप शंकर वंजारी रा. लिंब, ता. सातारा यांच्या मालकीच्या महिंद्रा कंपनीच्या मराझो मॉडेलच्या गाडी सारखी दिसणारी गाडी घेऊन वंजारी यांच्या गाडीचा क्रमांक एमएच ११ सीक्यू ९८४७ सारखीच बनावट नंबर प्लेट तयार करून ती नंबर प्लेट स्वतःच्या मालकीची खरी आहे, म्हणून वापरून फसवणूक केल्याप्रकरणी शिवाजी विलास सावंत (पाटील) रा. लिंब, ता. सातारा यांच्यावर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात वाहनचालकावर गुन्हा

**सातारा :** मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात वाहन चालकावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक २१ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेतीन वाजण्याची सुमारास चिंचणी सातारा रस्त्यावरील साई संगम हॉटेल च्या समोर सुनील भटू सिंग गावित उर्फ भैय्या राहणार कोलदे, तालुका नंदुरबार, जिल्हा नंदुरबार हा चालवत असलेल्या मोटरसायकल क्रमांक एमएच १६ व्ही ४४२० ला अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात चालवून धडक देऊन सुनील गावित यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला. तसेच अपघात स्थळी कोणतीही वैद्यकीय मदत न करता तसेच पोलिसांना अपघाताची माहिती न देता पळून गेला.

या प्रकरणी अज्ञात वाहन चालकावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार कारळे करीत आहेत.

# स्व. लक्ष्मणराव पाटील यांच्या जयंतीदिनी विजय कुवळेकर यांचे व्याख्यान

## प्रमोद शिंदे यांची माहिती

**भुईंज : प्रतिनिधी**

किसन वीर कारखान्याचे माजी चेअरमन, सातारा जिल्हा बँकेचे माजी चेअरमन तथा सातारा लोकसभा मतदार संघाचे माजी खासदार स्व. लक्ष्मणरावतात्या पाटील यांच्या जयंतीनिमित्त किसन वीर सातारा सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आली असल्याची महिती एका पत्रकाद्वारे कारखान्याचे उपाध्यक्ष प्रमोद शिंदे यांनी दिली.



पत्रकात पुढे म्हटले आहे की, कार्यकर्त्यांना ताकद देणारा नेता म्हणजे लक्ष्मणरावतात्या पाटील आहेत. जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसला बळकटी मिळवून देण्यामध्ये तात्यांचा हात मोठा आहे. तात्यांनी सार्वजनिक जीवनात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, क्षेत्रामध्ये आपल्या कामाचा ठसा उमठविलेला दिसून येतो. तात्यांच्या जाण्याने आम्हा कार्यकर्त्यांमध्ये जी पोकळी निर्माण झालेली होती. ती पोकळी भरून काढण्याचे काम किसन वीर कारखान्याचे चेअरमन आमदार मकरंदआबा पाटील करीत आहेत. स्व. लक्ष्मणरावतात्या पाटील यांच्या जयंतीनिमित्त शनिवार (दि. २५) रोजी दुपारी १ वाजता कारखाना कार्यस्थळावर ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आलेले असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी राज्यपाल खासदार श्रीनिवास पाटील किसन वीर साखर कारखान्याचे चेअरमन आमदार मकरंदआबा पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. विजय कुवळेकर यांनी सकाळ, लोकमत यांसारख्या वृत्तपत्रांचे मुख्य संपादक म्हणून काम पाहिले आहे. काही काळ त्यांनी झी २४ तास या मराठी वृत्तवाहिनीचे आणि झी मराठी दिशा या साप्ताहिकाचे मुख्य संपादक म्हणूनही काम पाहिले आहे. ते राज्याचे माहिती आयुक्त होते आणि अभ्यासू वक्ते, लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. बडोद्यात २०१४मध्ये झालेल्या २६व्या सावरकर साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद त्यांनी भूषविलं होतं.

स्व. लक्ष्मणरावतात्या पाटील यांच्या जयंतीनिमित्त होणाऱ्या व्याख्यानास कार्यक्षेत्रातील सर्व सभासद बंधू-भगिनी, हितचिंतक, कंत्राटदार, वाहन मालक आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहनही सातारा जिल्हा बँकेचे चेअरमन नितीनकाका पाटील, किसन वीर कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रमोद शिंदे, प्र. कार्यकारी संचालक अशोक शिंदे, कारखान्याच्या संचालक मंडळाने केले आहे.

### स्व. लक्ष्मणरावतात्या पाटील यांची जयंतीनिमित्त बोपेगावात रंगणार किर्तन

**राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी खासदार लक्ष्मणरावतात्या पाटील यांच्या जयंतीनिमित्त जन्मगावी म्हणजे बोपेगाव, ता. वाई येथे पंचक्रोशीतील ग्रामस्थांकरिता सुश्राव्य किर्तनाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. अखिल भारतीय वारकरी संघटनेचे अध्यक्ष ह. भ. प. जयंतमहाराज बोधले यांच्या सुश्राव्य किर्तनाचा कार्यक्रम सायंकाळी सात वाजता होणार असून सर्वांनी या किर्तनाचा आस्वाद घेण्याचे आवाहनही बोपेगांव ग्रामस्थांच्यावतीने उपसरपंच नारायण शिंदे यांनी केले आहे.**

# किसन वीर महाविद्यालयामध्ये एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न

**वाई : प्रतिनिधी**

वाई येथील जनता शिक्षण संस्थेचे किसन वीर महाविद्यालय आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इसरो) यांच्या स्पेस एप्लीकेशन सेंटर(सॅक) अहमदाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक १७ फेब्रुवारी २०२३ रोजी ''अवकाश विज्ञान व तंत्रज्ञानातील संधी आणि वर्तमान प्रवाह'' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा यशस्वीरित्या संपन्न झाली.या प्रसंगी विविध शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती.




कार्यशाळेचे उद्घाटन जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. मदन दादा भोसले यांच्या हस्ते झाले. याप्रंसगी इसरोचे शास्त्रज्ञ श्री.राजेंद्र गायकवाड व श्री संतोषकुमार त्रिपाठी तसेच संस्थेचे संचालक केशवराव पाडळे सचिव जयवंत चौधरी खजिनदार प्रा.नारायण चौधरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुरुनाथ फगरे, उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य डॉ.गुरुनाथ फगरे यांनी उपस्थितांचे स्वागत करून महाविद्यालयाबद्दल माहिती दिली. तसेच शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात अशा प्रकारची इसरो सोबत कार्यशाळा प्रथमच होत असल्याचे प्रतिपादन केले. कार्यशाळेचे समन्वयक प्रा.भिमराव पटकुरे यांनी प्रस्तावनेत कार्यशाळा घेण्यामागील उद्देश सांगून, विद्यार्थी संशोधक व शिक्षकांना होणाऱ्या फायद्याबद्दल माहिती दिली .

कार्यशाळेचे उद्घाटक व अध्यक्ष मा. मदन दादा भोसले म्हणाले की, ''अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये इसरो या संस्थेची स्थापना झाली होती. कोणत्याही आधुनिक प्रकारची संसाधने नसताना इसरोने अवकाश तंत्रज्ञानात जी प्रगती केली आहे त्याला तोड नाही. या संस्थेने आपलं पहिलं रॉकेट सायकलवरून आणले होते. पण आज अंतराळ संशोधनात इसरो ही देशातच नव्हे तर जगातील एक नामांकित संस्था म्हणून कार्यरत आहे. याचा आम्हा भारतीयांना सार्थ अभिमान वाटतो.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात शास्त्रज्ञ श्री राजेंद्र गायकवाड यांनी अवकाश तंत्रज्ञानाने पृथ्वीची भौगोलिक निरीक्षणे कशी नोंदवली जातात व त्याचा उपयोग दूरसंचार प्रसारण, हवामान शास्त्र, शोध,आणि बचाव कार्य इत्यादीबद्दल विस्तृत मार्गदर्शन केले. यावर आधारित वेदाज या मोबाईल ॲप्लिकेशनबद्दल त्यांनी माहिती दिली. या सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. विनोद वीर यांनी भूषविले.

दुसऱ्या सत्रात शास्त्रज्ञ श्री संतोषकुमार त्रिपाठी यांनी क्षेपणास्त्र विज्ञानाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देऊन अप्रत्यक्षरीत्या उपग्रहाच्या आधारे पृथ्वीच्या पृष्ठभागाचा अभ्यास कसा करायचा व त्यासाठी अंतराळ उपयोग केंद्र अहमदाबाद येथे असलेल्या सुविधा बद्दल माहिती दिली. या सत्राचे अध्यक्ष डॉ.हेरंब गायकवाड हे होते. तीसऱ्या सत्रामध्ये डॉ. एस. पी. व्यास यांनी ऑनलाइन पद्धतीने, भारतीय अंतरिक्ष विभागातर्फे प्रक्षेपित अवकाश उपग्रहाच्या माध्यमातून पृथ्वीची निरीक्षणे कशी नोंदवली जातात, या निरीक्षणाच्या आधारे आपत्कालीन व्यवस्थापनासाठी राष्ट्रीय डेटाबेसच्या अंतर्गत नैसर्गिक आपत्तीप्रसंगी जीयुआय आधारित निर्णय समर्थन साधने, नैसर्गिक आपत्तीचे अंतर आणि क्षेत्र मोजमाप, शोध इत्यादीसाठी जीआयएस आधारित उपयुक्तता साधने, मोबाईल ॲप्लिकेशन्स,एसएमएस पोर्टल द्वारे आपत्ती घटना अहवाल, उपभोगत्या सोबत ऑडिओ व्हिडिओ लाईव्ह चॅट साधने, इ. विषयांवर मार्गदर्शन केले.

या राष्ट्रीय कार्यशाळेच्या समारोप समारंभाला महाविद्यालय विकास समिती सदस्य सीए. उदयभाई गुजर हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. तर समारंभाचे अध्यक्ष डॉ.सुनील सावंत हे होते. याप्रसंगी मा. मदन दादा भोसले हेही उपस्थित होते. डॉ.विनोद वीर यांनी संपूर्ण कार्यशाळेचे अहवाल वाचन केले. याप्रंसगी प्रमुख पाहुणे श्री.उदयभाई गुजर यांनी आपण ज्या संस्थेमध्ये शिकलो त्या संस्थेबद्दल नेहमी कृतज्ञ असले पाहिजे. कोणतीही गोष्ट साध्य करण्यासाठी सातत्याने कष्ट केले पाहिजे.आणि हे करत असताना पर्यावरण संरक्षणाबद्दल आपण जाणीवपूर्वक काळजी घेतली पाहिजे. ही त्रिसूत्री विद्यार्थ्यांनी जोपासली पाहिजे.असे प्रतिपादन केले. श्री उदयभाई गुजर यांच्या हस्ते कार्यशाळेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रतिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. कार्यशाळेचे सहसमन्वयक डॉ.राहुल वळीव यांनी सर्वांचे आभार मानले.

# कानकात्रे गावासाठी २४x७ सुधारित योजना मंजूर – डॉ. दिलीपराव येळगावकर

**वडूज : प्रतिनिधी**


कायम दुष्काळात राहणाऱ्या खटाव तालुक्यातील कानकात्रे येथे नवीन सुधारित २४÷७ नळ पाणीपुरवठा योजना मंजूर झाली असल्याची माहिती माजी आमदार डॉ. दिलीपराव येळगावकर यांनी दिली.



पुढें बोलताना डॉ. येळगावकर म्हणाले की, खटाव तालुक्यातील सोळा गावांना टेंभू योजनेतून पिण्याचे पाणी हायकोर्टातून मिळवले आता मायणी तलाव उद्भव धरून या १६ गावांना आपण २४ बाय ७ योजनेतून नळ पाणीपुरवठा योजना शासन दरबारी मंजूर करणार असून त्यापैकी कानकात्रे गावासाठी ५५ लाख २७९६८ रुपयाची योजना मंजूरी मिळाली याची तांत्रिक मान्यता ही मिळाली आहे वास्तविक टेंभू योजना ही मायणी परिसरातून तरसवाडी घाटातून आटपाडी भागाकडे जाणे गरजेचे होते परंतु राजकीय दबावामुळे सदर योजना चितळी माहुली मार्गे आटपाडीकडे गेली. या ज्या जिल्ह्यात अशी योजना तयार होते त्या जिल्ह्याचा त्या पाण्यावर प्रथम अधिकार असतो यासाठी मी हायकोर्टातून टेंभू योजनेचे पाणी सोळा गावासाठी मिळवले आता या संपूर्ण सोहळा गावात २४ बाय सात योजना शासनाकडून पूर्ण करून घेण्याचा निर्धार केला आहे सदरची योजना मंजूर केल्याबद्दल ग्रामपंचायतीच्या व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला.

यावेळी किरण जाधव दादासो चव्हाण अमित जाधव शरद जाधव दीपक जाधव अशोक जाधव तानाजी जाधव बाळकृष्ण जाधव दुर्योधन जाधव रामचंद्र नामदेव जाधव सुरज पाटील राजकुमार कचरे अंकुश रजपूत मधुकर कचरे आनंदा शेवाळे पिंटू सोमदे विजय कवडे चंदन वरुडे उपस्थित होते शेवटी किरण जाधव यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.

# अडचणीतील अदानी समूहाला श्रीलंकेने दिली गुड न्यूज, आता चिंता मिटणार!



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अमेरिकेतील रिसर्च संस्था हिंडेनबर्गच्या रिपोर्टनंतर अदानी समूहाला एकामागून एक अनेक धक्के बसत आहेत. शेअर बाजारात गौतम अदानींच्या कंपन्यांचे शेअर्स गडगडले आहेत. अब्जाधीशांच्या यादीतही अदानींची घसरण झाली आहे. अशातच अदानींसाठी श्रीलंकेतून एक चांगली बातमी आली आहे.

श्रीलंकेच्या सरकारने अदानी समूहाच्या ४४.२ कोटी डॉलरच्या गुंतवणुकीला मंजुरी दिली आहे. श्रीलंकेने आज या गुंतवणुकीची घोषणा केली. श्रीलंका दिवाळखोरीत निघाल्यानंतर ही पहिली विदेशी गुंतवणूक आहे. अदानी समूह श्रीलंकेत दोन पवन ऊर्जा प्रकल्प उभारणार आहे. अदानी समूहाची अदानी ग्रीन एनर्जी ही कंपनी श्रीलंकेच्या उत्तरेत हे दोन पवन ऊर्जा प्रकल्प विकसित करेल. २०२५ मध्ये या प्रकल्पाद्वारे वीजपुरवठा सुरू सुरू होईल. अदानी समूहाचा श्रीलंकेतील हा दुसरा मोठा प्रकल्प आहे. यापूर्वी २०२१ मध्ये कोलंबमध्ये सामरिक बंदर टर्मिनल उभारण्याचं कंत्रात अदानी समूहाला मिळालं होतं. या प्रकल्पाचा एकूण खर्च हा ७० कोटी डॉलर इतका होता.

अदानी समूह कोलंबो हार्बरमध्ये चीनच्या टर्मिनल लगत १.४ किमी लांब आणि २० मीटर रुंद जेटी बांधत आहे. हे दुबई आणि सिंगापूर दरम्यानचे एकमेव डीपी-सी कंटेनर बंदर आहे. पवन ऊर्जा प्रकल्पाबाबत अंतिम निर्णय घेण्यापूर्वी बुधवारी कोलंबोमध्ये अदानी समूहाच्या अधिकाऱ्यांची भेट झाली होती, अशी माहिती श्रीलंकेचे ऊर्जामंत्री कंचन विजयशेखर यांनी दिली. यासंदर्भात एएफपीने वृत्त दिले आहे. हा पवन ऊर्जा प्रकल्प डिसेंबर २०२४ मध्ये सुरू होईल. सध्या अदानी एनर्जीच्या शेअर्समध्ये मोठी घसरण दिसून आली आहे. गेल्या ५२ आठवड्यांतील सर्वात कमी किमतीवर शेअरची ट्रेडींग सुरू आहे.

अमेरिकेतील हिंडेनबर्ग रिसर्चने २४ जानेवारीला अदानी ग्रुपबाबत एक रिपोर्ट जाहीर केला होता. अदानी समूहाने अनेक वर्षांपासून शेअरमध्ये हेराफेरी केली आहे, असा आरोप रिपोर्टमधून करण्यात आला होता. पण अदानी समूहाने हिंडेनबर्ग रिसर्चचा हा रिपोर्ट फेटाळून लावला आहे. पण हा रिपोर्ट आल्यापासून अदानी समूहातील अनेक कंपन्यांचे शेअर्स घसरले आहेत. यामुळे समूहाचे बाजार मूल्यही ६० टक्क्यांहून अधिक घसरले आहे. या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी अदानी समूहाने आपल्या रणनितीत बदल केला आहे. आता कंपनीचा भर हा आक्रमक विस्ताराऐवजी रोकड वाचवणं आणि कर्ज कमी करण्यावर आहे.

# भूकंपग्रस्त तुर्कीचा पाकिस्तानने केला मोठा विश्वासघात

**अंकारा : वृत्तसंस्था**

दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या पाकिस्तानने आपला मित्रदेश तुर्कीसोबत मोठी फसवणूक केली. अलीकडेच पाकिस्तान सरकारने तुर्कस्तानच्या भूकंपग्रस्तांसाठी काही मदत पाठवली होती. विशेष म्हणजे ही तीच मदत सामग्री होती जी गतवर्षी पाकिस्तानात आलेल्या पुराच्या वेळी तुर्कीने पाकिस्तानला पाठवली होती.

पाकिस्तानच्या या कृत्याचा खुलासा तुर्कस्तानची राजधानी अंकारा येथे राहणाऱ्या एका पाकिस्तानी विद्यार्थ्याने एका व्हिडिओ संदेशात केला आहे. पाकिस्तानच्या सामाजिक कार्यकर्त्या झाहरा बलोच यांनी हा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे.

६ फेब्रुवारीला तुर्की आणि सीरियामध्ये ७.८ रिश्टर स्केलचा भूकंप झाला होता. दोन्ही देशांमध्ये एकूण ४७ हजार लोकांचा मृत्यू झाला. तुर्कीमध्ये मृतांचा आकडा ४२ हजारांवर पोहोचला आहे. कठीण काळात भारतासह अनेक देशांनी तुर्कस्तानला मदत पाठवली.

काश्मीरसह अनेक मुद्द्यांवर तुर्की पाकिस्तानला प्रत्येक व्यासपीठावर पाठिंबा देत आहे. त्यामुळे पाकिस्ताननेही मदत पाठवली. आता याच मदतीवरून वाद निर्माण झाला आहे. खरे तर पाकिस्तानच्या शाहबाज शरीफ सरकारने मदतीच्या नावाखाली तुर्कस्तानला तेच मदत साहित्य पाठवले, जे तय्यब एर्दोगान सरकारने गेल्या वर्षी पाकिस्तानातील पूरग्रस्तांसाठी पाठवले होते.

सुमारे ३ कोटी लोकांना या पुराचा फटका बसला होता. सुमारे २ हजार लोकांचा मृत्यू झाला होता. जगातील अनेक देश आणि संघटनांनी पाकिस्तानला तेव्हा मदत केली होती.




पाकिस्तानातील अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी तुर्कस्तानच्या विविध विद्यापीठांमध्ये जातात. अशाच एका विद्यार्थ्याने तुर्कीतून व्हिडिओ बनवून आपल्या सरकारच्या कृत्याचा पर्दाफाश केला. आता हा व्हिडिओ व्हायरल होत आहे. शोएब खटक असे या विद्यार्थ्याचे नाव आहे.

व्हिडिओमध्ये तो म्हणतो- मी तुर्कीच्या टीव्ही चॅनेलवर ही बातमी पाहिली. त्यात म्हटले होते की, आमच्या सरकारने तुर्कस्तानच्या भूकंपग्रस्तांसाठी तुर्कस्तानने पाकिस्तानातील पूरग्रस्तांसाठी पाठवलेल्या मालावर स्वतःचा टॅग लावून पाठवला.

शोएब पुढे म्हणतो- याआधी कधीच इतकी लाज वाटली नव्हती. पाकिस्तानात लोक कसे राज्य करत आहेत ते तुम्हीच बघा. मग तुर्कस्तानने आमच्या पंतप्रधानांना अंकाराला भेट देऊ दिली नाही, अशी त्यांची तक्रार आहे. येथे येऊन शाहबाज शरीफ यांचा उलट अपमान होईल.

हा व्हिडिओ समोर आल्यानंतर काही मीडिया रिपोर्ट्समध्ये असा दावा करण्यात आला आहे की, तुर्कीच्या एर्दोगन सरकारने या कृत्याबद्दल पाकिस्तानला फटकारले आहे. मात्र, आतापर्यंत दोन्ही देशांकडून अधिकृत वक्तव्य आलेले नाही. एका वृत्तानुसार, इस्लामाबादमधील तुर्कीच्या राजदूताने पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाला याबाबत माहिती दिली आहे.

पाकिस्तानच्या मोठ्या टीव्ही न्यूज चॅनल 'बोल टीव्ही'चे पत्रकार शाहिद मसूद यांनीही आपल्या शोमध्ये या घटनेबद्दल सांगितले. शरीफ आणि परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो झरदारी यापूर्वी ८ फेब्रुवारीला अंकाराला भेट देणार होते. तेव्हा तेथील सरकारने वाईट परिस्थितीचे कारण देत त्यांना न येण्यास सांगितले होते.


तुर्की हे इस्लामिक सहकार्य संघटनेचे महत्त्वाचे सदस्य आहेत आणि पाकिस्तानही. इम्रान खान यांच्या काळात तुर्कीमुळे पाकिस्तान आणि सौदी अरेबियाचे संबंध बिघडले.

तुर्की आणि सीरियामध्ये ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ३ मोठे भूकंप झाले. तुर्कीच्या वेळेनुसार पहिला भूकंप पहाटे ४ वाजता (७.८), दुसरा सकाळी १० वाजता (७.६) आणि तिसरा दुपारी ३ वाजता (६.०) झाला. यानंतर आफ्टरशॉकही नोंदवले गेले. त्यांची तीव्रता ४ ते ५ इतकी होती. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.५३ वाजता तुर्कीमध्ये आणखी एक भूकंप झाला. यानंतर दुपारी १२.४१ वाजता ५.४ रिश्टर स्केलचा भूकंप झाला.

६ फेब्रुवारी रोजी झालेल्या तीन मोठ्या भूकंपांमुळे तुर्की आणि सीरियामध्ये मृतांची संख्या ४७ हजारांच्या पुढे गेली आहे. तुर्कीमध्ये ४१,१५६ हून अधिक लोकांनी आपला जीव गमावला आहे. सीरियामध्ये ५,८०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (थक्ज) नुसार, दोन्ही देशांतील २६ दशलक्ष लोकांना मदतीची गरज आहे. गेल्या ७५ वर्षांत पहिल्यांदाच थक्ज एवढ्या मोठ्या प्रमाणावर बचाव मोहीम राबवत आहे.

# 'तारुण्याच्या दिवसांत मी मधुबालासारखी दिसायचे'

कंगना रनोटनेमधुबाला यांच्याशीच केली स्वतःची तुलना; बिग बींवरही साधला निशाणा





**मुंबई : प्रतिनिधी**

आज मधुबाला यांची ५४वी पुण्यतिथी आहे. अभिनेत्री कंगना रनोटने त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त एक फोटो पोस्ट करून दिग्गज अभिनेत्री मधुबाला यांचे स्मरण केले आहे. कंगनाने मधुबाला यांचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. करिअरच्या सुरुवातीच्या काळात मी हुबेहुब मधुबाला यांच्यासारखी दिसायचे, पण त्याबाबत मी ठाम नाही, असे म्हटले आहे.

कंगना म्हणते की, तिने मधुबाला यांची भूमिका पडद्यावर साकारावी असे अनेकांचे म्हणणे आहे. यासोबतच आणखी एका पोस्टमध्ये कंगनाने अमिताभ बच्चन यांच्यावर 'इमर्जन्सी' चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखेवरुन निशाणा साधला आहे.

कंगना रनोटने तिच्या सोशल मीडियावर मधुबाला आणि तिच्या छायाचित्रांचा कोलाज शेअर केला आणि लिहिले, ''मी मोठ्या पडद्यावर मधुबाला यांची भूमिका साकारावी असे लोकांना वाटते. जेव्हा मी माझ्या करिअरची सुरुवात केली तेव्हा मधुबाला ऐन तारुण्यात जशा दिसत होत्या तशीच मी दिसायचे. पण अजूनही मी याबाबत ठाम नाही.''.

कंगनाने चित्रपटसृष्टीतील तिच्या सुरुवातीच्या दिवसांचा एक फोटोही शेअर केला आहे. या फोटोत तिने काळ्या रंगाचा ड्रेस घातला आहे.

**गतकाळातील सर्वात सुंदर अभिनेत्रींपैकी एक होती मधुबाला**

प्रसिद्ध अभिनेत्री मधुबाला यांची आज ५४ वी पुण्यतिथी आहे. मधुबाला यांचा जन्म १४ फेब्रुवारी १९३३ रोजी दिल्लीत झाला होता. १९४२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'बसंत' या चित्रपटातून त्यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली. यानंतर त्यांनी महल, बादल, काली, बरसात की रात, नील कमल यांसारख्या उत्तमोत्तम चित्रपटांमध्ये आपले अभिनय कौशल्य सिद्ध केले.

'मुघल-ए-आझम'मधील अनारकली या पात्राने त्यांना प्रसिद्धी मिळवून दिली. २३ फेब्रुवारी १९६९ रोजी वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी मधुबाला यांचे आजारपणामुळे निधन झाले.

कंगनाने नुकत्याच केलेल्या ट्वीटमध्ये अमिताभ बच्चन आणि टी-सीरिजचे मालक भूषण कुमार यांच्यावर निशाणा साधला आहे. कंगना म्हणाली, ''मी जेव्हा माझा आगामी 'इमर्जन्सी' चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी तारीख शोधत होते, तेव्हा मला जाणवले की यंदा अनेक तारखा उपलब्ध आहेत. पण मी माझ्या पोस्ट प्रोडक्शनचा विचार करुन २० ऑक्टोबर ही तारीख निश्चित केली. त्यानंतर आता आठवड्याभरातच टी सीरिजचे सर्वेसर्वा भूषण कुमार यांनीही २० ऑक्टोबर रोजी चित्रपट प्रदर्शित करण्याचे ठरवले. संपूर्ण ऑक्टोबर महिना तसा रिकामी आहे. फक्त ऑक्टोबरच नव्हे तर नोव्हेंबर, डिसेंबर आणि अगदी सप्टेंबर महिनाही रिकामी आहे. पण तरीही अमिताभ बच्चन आणि टायगर श्रॉफ यांनी त्यांच्या चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी २० ऑक्टोबर हीच तारीख निवडली.

कंगना पुढे म्हणाली, ''मला वाटतंय की, बॉलिवूडच्या माफिया टोळीमध्ये महत्त्वाची बैठक झाली असावी. पण आता मी इमर्जन्सीचा ट्रेलर आणि त्याच्या प्रदर्शनाची तारीखी महिनाभर आधीच जाहीर करेन,'' असे तिने स्पष्ट केले आहे.

**इंदिरा गांधींच्या भूमिकेत दिसणार आहे कंगना**

कंगनाने अलीकडेच तिच्या 'इमर्जन्सी' चित्रपटाचे शूटिंग पूर्ण केले आहे. या चित्रपटात कंगना इंदिरा गांधींच्या भूमिकेत दिसणार आहे. कंगनाच्या म्हणण्यानुसार, हा तिचा ड्रीम प्रोजेक्ट आहे आणि यासाठी तिने तिची मालमत्ता गहाण ठेवली आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शनही कंगना करत आहे. या चित्रपटात कंगना व्यतिरिक्त महिमा चौधरी, अनुपम खेर, श्रेयस तळपदे आणि विशाक नायर देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.

# पूल गेमचा पराभव जिव्हारी लागल्याने गोळीबार, १२ वर्षीय मुलीसह ७ जण ठार

## दोन्ही हल्लेखोर फरार; ब्राझीलची घटना



**ब्राझिलिया : वृत्तसंस्था**

ब्राझीलचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यात २ जण गोळीबार करताना दिसून येत आहेत. या घटनेत एका १२ वर्षीय मुलीसह ७ जणांचा मृत्यू झाला आहे. हल्ल्यानंतर दोन्ही आरोपी फरार झालेत.

पूल गेममधील पराभव जिव्हारी लागल्यामुळे आरोपींनी गोळीबार केल्याचे सांगण्यात येत आहे. पराभवानंतर हॉलमधील उपस्थित लोक त्यांच्यावर हसत होते. आरोपींना हे सहन झाले नाही. त्यांनी संतापाच्या भरात त्यांच्यावर गोळीबार केला. आता पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत.

व्हिडिओत दिसून येत आहे की, खेळ संपल्यानंतर सर्वजण हॉलमध्ये एकत्र बसले होते. तेव्हा अचानक एक व्यक्ती बंदूक घेऊन तिथे येतो. तो सर्वांना हातवर करण्यास सांगतो. त्यानंतर त्यांना भींतीकडे तोंड करून रांगेत उभे राहण्याची सूचना करतो.

दुसरा व्यक्ती गाडीतून शॉटगन घेऊन येतो. त्यानंतर दोन्ही हल्लेखोर निशस्त्र नागरिकांवर अंदाधूंद गोळीबार करतात. त्यात ७ जणांचा जागीच मृत्यू होतो. व्हिडिओत हे सर्वजण जमिनीवर कोसळताना दिसून येत आहेत. काही लोक जीवाच्या आकांताने पळून जातानाही दिसून येत आहेत.

ही घटना २१ फेब्रुवारीची असल्याचा दावा केला जात आहे. न्यूयॉर्क पोस्टच्या वृत्तानुसार, ही घटना माटो ग्रोसो स्टेटच्या सिनोप सिटीमध्ये घडली. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले - येते पूल गेम केळताना गोळीबार झाला. आरोपी एडगर रिकार्डो डी ओलिव्हेरा व एजेकियास सूजा रिबेरो यांचा गेममध्ये पराभव झाला होता. त्यानंतर येथे उपस्थित सर्वजण त्यांच्यावर हसत होते.

एडगर व एजेकियास यांना हे सहन झाले नाही. त्यांनी त्यांच्यावर अंदाधूंद गोळीबार सुरू केला. काही वेळाने दोन्ही हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले.

**अमेरिकेच्या फ्लोरिडातही दोनदा गोळीबार**

अमेरिकेच्या फ्लोरिडात गोळीबाराच्या २ घटना घडल्यात. त्यात ३ जणांचा बळी गेला आहे. या दोन्ही घटना एकमेकांशी संबंधित होत्या. यासंबंधीच्या वृत्तानुसार, गुरुवारी सकाळी एक हल्लेखोर २० वर्षीय तरुणीला गोळ्या घालून फरार झाला होता.

ही घटना कव्हर करण्यासाठी २ पत्रकार गेले होते. तेव्हा हल्लेखोर पुन्हा आला. त्याने पत्रकारांसह तिथे उपस्थित असलेल्या अन्य एका आई व मुलीवर गोळीबार केला. त्यात एका पत्रकारासह ९ वर्षीय मुलीचा मृत्यू झाला. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

# जी२० देशाला मिळालेली विशेष जबाबदारी : १ वर्षात भारत जे करेल, त्यामुळे जगाच्या राजकारणात मोठा फरक पडेल

## मंत्री डॉ. एस. जयशंकर यांचे प्रतिपादन




**पुणे : प्रतिनिधी**

भारताचे जी-२० अध्यक्षपद ही जगासाठी आव्हानात्मक असलेल्या काळात भारताला मिळालेली एक विशेष जबाबदारी आहे, असे मत, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी गुरुवारी व्यक्त केले. आज जगाला भेडसावणाऱ्या आणि भविष्यातील समस्यांवर आज भारत जगाला उपाय शोधून देणारा देश ठरला आहे, असेही त्यांनी सांगितले.

पुण्याजवळच्या लवाळे येथील सिंबॉयसिस आंतरराष्ट्रीय (अभिमत विद्यापीठ) परिसरात गुरुवारी भारताच्या जी-२० अध्यक्षपदाच्या काळातील जी-२०- विचारवंत महोत्सव शिखर परिषदेत त्यांचे व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते.

एस. जयशंकर म्हणाले, देशहिताचे संरक्षण करण्यासाठी उभे राहण्याचा आमचा भक्कम संकल्प आहे, तसेच दक्षिणेकडील राज्यांचा आवाज बनण्याची स्वायत्तताही आहे.

आज जगाचा भारताकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे, यावर भर देत, ते म्हणाले की भारत एक सभ्य संस्कृतीचा वारसा असलेला देश असून या काळात अशा नव्या युगाचे नेतृत्व करत आहोत जिथे विविधतेचा आदर ठेवला जातो. एक असा देश, ज्याची ऊर्जा, उत्साह आणि सृजनशीलता दिवसेंदिवस वाढते आणि त्याच्या भवितव्याविषयी संपूर्ण जगाला विशेष रस आहे.

जी २० च्या अध्यक्षपदाविषयी बोलताना डॉ. जयशंकर म्हणाले की ऋ-२० हे सर्वात महत्त्वाचे आंतरराष्ट्रीय व्यासपीठ आहे आणि या अध्यक्षपदाच्या एक वर्षाच्या कारकिर्दीत भारत जे काही करेल, त्यामुळे जगाच्या राजकारणात मोठा फरक पडू शकेल.

सिंबॉयसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे संस्थापक आणि अध्यक्ष तसेच कुलगुरू डॉ. एस.बी. मुजुमदार, या समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमाला परदेशी विद्यार्थ्यांसह विविध विद्या शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते, कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी जयशंकर यांच्याशी संवादही साधला. जय शंकर यांनी विद्यार्थ्यांना यावे विविध प्रश्नांवर समर्पक उत्तर देत त्यांच्या शंकांचे निरसन केले.

# विश्वभारती विद्यापीठात दाखवणार बीबीसीची डॉक्युमेंट्री : भाजपचा आक्षेप

**बोलपूर (प. बंगाल) : वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालच्या विश्वभारती विद्यापीठाचा गुरुवारी दीक्षांत समारंभ आहे. ज्यामध्ये संरक्षण मंत्री राजनाथ सिंह प्रमुख पाहुणे म्हणून अनेक कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, विद्यार्थ्यांच्या एका गटाने इइउची वादग्रस्त डॉक्यूमेंट्री 'इंडिया द मोदी क्वेश्चन' प्रसारित करण्याची घोषणा केली आहे.

बोलपूर पोलिसांनी डॉक्युमेंट्रीचे प्रसारण करण्यास कोणतीही परवानगी दिलेली नाही. मात्र, या विद्यार्थ्यांच्या गटाने त्याचा प्रचार सुरू केला आहे. त्यामुळे पोलिसांनी त्यांना तसे न करण्याचा इशारा दिला आहे.

दुसरीकडे बीरभूम भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष धुरबा साहा यांनी असे कृत्य करणे म्हणजे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचा अपमान असल्याचे म्हटले आहे.

संरक्षण मंत्री आणि केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री सुभाष सरकार गुरुवारी सायंकाळी ५ वाजता बोलपूर-शांतिनिकेतनला पोहोचणार आहेत. शुक्रवारी सकाळी दीक्षांत समारंभ होणार आहे. डॉक्युमेंट्री दाखवण्यासाठी विद्यार्थ्यांनी कॅम्पसमधील रतनपल्ली निमतळा घाटाची निवड केली आहे. सायंकाळी ५ वाजल्यापासून टेलिकास्ट सुरू होईल.

संध्याकाळी साडेसहा वाजता राजनाथ सिंह ज्या ठिकाणी टागोर यांचे संगीतमय भानु सिंघेर पदावली पाहणार आहेत, तेथून हे ठिकाण हाकेच्या अंतरावर आहे. यानंतर ते विश्वभारतीचे कुलगुरू विद्युत चक्रवर्ती यांची भेट घेणार आहेत.


# काँग्रेस नेते पवन खेरा यांना सर्वोच्च दिलासा : अंतरिम जामीन मंजूर करत सुटकेचे निर्देश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रायपूरमध्ये काँग्रेसच्या अधिवेशनाला जात असताना पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते पवन खेरा यांना पोलिसांनी अटक केली. एक दिवसापूर्वी आसाम पोलिसांनी जातीय तेढ आणि राष्ट्रीय सुरक्षेवरून त्यांच्यावर दिमापूरमध्ये गुन्हा दाखल केला होता.

अटकेबाबत वकील अभिषेक मनु सिंघवी सर्वोच्च न्यायालयात पोहोचले. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती एमआर शहा आणि न्यायमूर्ती पीएस नरसिम्हा यांच्या खंडपीठाने दुपारी ३ वाजता सुनावणी सुरू केली आणि सुमारे ३५ मिनिटे सुनावणी घेतल्यानंतर पवन खेरा यांना अंतरिम जामीन मंजूर केला. न्यायालयाने आसाम आणि उत्तर प्रदेश सरकारांना नोटिसाही बजावल्या आणि तीन ठिकाणी नोंदवलेले खटले एकाच अधिकारक्षेत्रात आणण्याबाबत प्रश्न उपस्थित केले. आसाम सरकारच्या वतीने एएसजी ऐश्वर्या भाटी यांनी युक्तिवाद केला.

तत्पूर्वी, गुरुवारी सकाळी खेरा यांना दिल्ली पोलिसांनी विमानातून उतरवले. रायपूरमध्ये शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या काँग्रेसच्या अधिवेशनात खेरा सहभागी होणार होते. या कारवाईच्या निषेधार्थ विमानात उपस्थित असलेले इतर काँग्रेस नेते भाजपविरोधात घोषणाबाजी करत विमानातून खाली उतरले.



इंडिगोच्या विमानात उपस्थित असलेले प्रवासी रणजीत कुमार यांनी दिव्य मराठीला घटनेची माहिती दिली. खेरा रायपूरला जाण्यासाठी विमानात बसले होते. यानंतर कर्मचार्यांनी त्यांना सांगितले की, त्यांच्याविरुद्ध डीसीबीची नोटीस आहे. याप्रकरणी हजरतगंज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले. यानंतर त्यांना सांगण्यात आले की, तुम्ही फ्लाइटने जाऊ शकत नाही.

दिल्ली पोलिसांच्या कारवाईवर प्रश्न विचारला असता खेरा म्हणाले, 'दिल्ली पोलिस अधिकारी माझ्याकडे आले आणि म्हणाले की तुमचे सामान तपासायचे आहे. मी म्हटले की कोणतेही सामान नाही. तरीही ते म्हणाले, आमच्यासोबत चला, आता डीसीपी तुमच्याशी बोलतील. मी वाट पाहत राहिलो, डीसीपी आले नाहीत. नियम आणि कायदे काय आहेत हे मला माहीत नाही. मी तर त्यांची वाट पाहत आहे.''

आसाम पोलिसांचे प्रवक्ते सुशांत भुयान यांनी दिव्य मराठीला सांगितले की, बुधवारी रात्री पवन खेरा यांच्याविरुद्ध जातीय तेढ आणि राष्ट्रीय सुरक्षेसंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी एक वक्तव्य केले होते, त्याविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. आता दिल्ली विमानतळावर सीआयएसएफ तैनात करण्यात आले आहे. आसाम पोलिसांच्या विनंतीवरून दिल्ली पोलिस खेरा यांना अटक करणार असल्याचे सूत्रांनी अछ्ख ला सांगितले.

पवन खेरा २० फेब्रुवारी रोजी दिल्लीत पत्रकारांशी बोलत होते. हिंडेनबर्ग अहवालावर ते म्हणाले, ''जेव्हा अटलबिहारी वाजपेयी जेपीसी बनवू शकतात, तेव्हा नरेंद्र गौतम दास मोदींना काय अडचण आहे.'' आपल्या निवेदनात त्यांनी नरेंद्र दामोदरदास मोदींना गौतमदास मोदी असे संबोधले.